Journal details from UGC website.

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Tifan (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | तिफण (print only) |
| **Publication Language** | Marathi |
| **Publisher** | Tifan |
| **ISSN** | 2231-573X |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Language |
| **Focus Subject** | Marathi |

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

Copyright © 2021 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer

UGC CARE List Journal, Group-D, Sr.No. 31

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

**(लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक)**

**वर्ष :** दहावे

**अंक :** पहिला/दुसरा (एप्रिल ते सप्टेंबर-२०१९)

**संपादक :**
**डॉ. शिवाजी हुसे**

**अतिथी संपादक :**
**डॉ. सर्जेराव जिगे, प्रा.संजय भालेराव**

**संपादक मंडळ :**
डॉ. ताहेर पठाण, डॉ. ममता इंगोले, डॉ. फुला बागुल,
डॉ. वंदना महाजन, डॉ. वामन जाधव, डॉ. रामचंद्र झाडे,
डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. अनिल गर्जे, डॉ. यशवंत सोनुने

**मूल्यमापन समिती**
डॉ. एस.एम. कानडजे (बुलडाणा), डॉ. अंबादास सगट (कन्नड)
डॉ. राजकुमार एल्लावाड (बीड), डॉ. माहेश्वरी गावित (अहमदनगर)
डॉ. प्रल्हाद वावरे (यवतमाळ)

**मांडणी :** आरती ग्राफीक्स, औरंगाबाद

**मुखपृष्ठ :** धोंडोपंत मानवतकर

**मुद्रक :** रूद्रायणी, औरंगाबाद

**वर्गणी**
वार्षिक २००/-, त्रै.वा. ५००/-, पं.वा. १०००/-

**पत्ता**
संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद - ४३११०३, मो.: ९४०४०००३९८

**स्वागत मूल्य**
१००/- रूपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही

या नियमकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिध्द झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

ATTESTED
PRINCIPAL
LOK.NETE GOPINATHJI MUNDE
Institute of Engineering Education & Research
Canada Corner Nashik-422 002



## या अंकात....

- *संपादकीय.....*
- *अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वातील निराळेपण / ९*
  प्रा. शिवाजी वाठोरे
- *उपेक्षितांचा बुलंद आवाज : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे / १४*
  डॉ. सतीश मस्के
- *काळावर मात करणारा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे / १८*
  डॉ. सर्जेराव जिगे
- *साहित्य कोहिनूर : अण्णा भाऊ साठे / २९*
  डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे
- *थोर समाजसुधारक : अण्णा भाऊ साठे / ३४*
  डॉ. विठ्ठल भंडारे
- *लोकशाहीर अण्णा भाऊ साठे / ३८*
  डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
- *अण्णा भाऊ साठे : बांधिलकी प्राणपणे जपणारा लेखक / ४५*
  प्रा. अरविंद भराडे
- *अण्णा भाऊ साठे-एक अढळ दीपस्तंभ / ५०*
  बबनराव शिंदे
- *अण्णा भाऊंचा आंबेडकरवाद / ५४*
  डॉ.सुरेश वाघमारे
- *अण्णा भाऊंनी धर्म व्यवस्था नाकारली /५८*
  डॉ.विजय कुमठेकर
- *अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मयीन कार्य /६५*
  डॉ.सरला गोरे
- *अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले सामाजिक विचार/ ६९*
  डॉ.सदाशिव सरकटे
- *लोकनाट्याचे जनक-लोकशाहीर अण्णा भाऊ साठे / ७५*
  डॉ. प्रवीण बनसोड


- *अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील साम्यवाद / ८१*
  डॉ. सुखदेव इघारे
- *अण्णा भाऊंच्या कथांमधील पात्रांचे दर्शन / ८९*
  डॉ.सूर्यकांत मा.सांभाळकर
- *कादंबरीकार अण्णा भाऊ साठे / ९३*
  डॉ.प्रमोद भीमराव गारोडे
- *साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे व त्यांचे कादंबरी विश्व / १०९*
  डॉ. गायत्री गाडेकर
- *अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन :आशय आणि वेगळेपण / ११४*
  डॉ. सोपान सुरवसे / डॉ. देविदास तेलंगे
- *''संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि अण्णा भाऊ साठे यांचे योगदान'' / १२५*
  डॉ. महेश खरात
- *शाहीर अण्णा भाऊ आणि संयुक्त महाराष्ट्र : एक आदिबंध / १३५*
  डॉ.गणेश चंदनशिवे
- *'माझा रशियाचा प्रवास' वर्गीय संघर्ष चित्तारणारे मनोवेधक प्रवासवर्णन / १३९*
  डॉ. दैवत दि. सावंत
- *अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील नायिका /१४४*
  डॉ.प्रेमला मुखेडकर
- *भटक्या-विमुक्ताचे व्यथादर्शन : 'माकडीचा माळ' / १५५*
  डॉ. रामनाथ गंगाधर वाढे
- *गावगाड्यातील सवर्ण-दलित संघर्ष - 'फकिरा' / १५९*
  डॉ. शिवाजी भिकाजी हुसे
- *कॉ. अण्णा भाऊ साठे यांचे परिवर्तनाला योगदान / १६६*
  डॉ.अनंता सूर
- *अण्णा भाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी विचारांपासून मातंग समाज दूर ! /१७३*
  राजेंद्र घुले
- *अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य विचाराची प्रासंगिकता / १७७*
  डॉ. संजय शिंदे






## विशेषांकाच्या निमित्ताने .....

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे मराठी भाषा, साहित्य आणि लोकसंस्कृतीला महत्त्वपूर्ण असे योगदान लाभले आहे. कथा, कांदबरी, लोकनाट्य, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन, गाणी अशा बहुविध वाङ्मय प्रकारात त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले आहे. अण्णा भाऊंचा जीवन प्रवास अतिशय दु:ख हाल, अपेष्ठा आणि संघर्षाचा राहिला आहे. अण्णा भाऊंच्या लेखणीची नाळ ही समाजातील दलित, कष्टकरी, भटके, विमुक्त आणि वंचितांच्या वेदनेशी जोडलेली होती. जे जगले, भोगले व अनुभवले तेच त्यांच्या लेखनाचे विषय झाले. कल्पनेच्या भरारी मारणारे, रंजनवादी लेखन न करता समाजातील प्रखर वास्तवाचे चित्रण त्यांनी केल्याचे दिसून येते. एकूणच मराठी साहित्याचा तोंडावळा बदलण्याचे काम त्यांच्या साहित्याने केले. त्यांच्या कथा, कांदबऱ्या म्हणजे तत्कालीन समाज जीवनाचा इतिहासच आहे. सामान्य, माणसाला नायकत्व बहाल करण्याचे काम त्यांनी केले सामाजिक परिवर्तनाचा विचार त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झाला आहे. समाजातील अन्याय, अत्याचार, वेदना, दु:ख आणि विषमतेविरूध्द युध्द पुकारणारा हा लढाऊ प्रवृत्तीचा, लेखक होता. ''पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती श्रमिकांच्या, तळहातावर तरलेली आहे'' असे क्रांती तत्वज्ञान त्यांनी बहुजन समाजाला दिले. 'फकीरा' ही अण्णाभाऊंची समाजाला दिलेली अनमोल देण आहे. शोषण आणि अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढणारा नायक म्हणून त्यांनी 'फकीरा' अजरामर केला.



# साहित्य कोहिनूर : अण्णा भाऊ साठे

11

■ डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे

प्रतिभेला रंग, रूप, वर्ण, वंश, जातपात व लिंगभेद ह्यांची कुंपणे नसतात. ती स्फुरते कुणाही सह्याला, अनुभूतीप्रत अस्वस्थ आत्म्याला. प्रतिभेचे आजच्या औपचारिक शिक्षणावाचून तरी कुठे अडते? विश्वाच्या शाळेतील उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या व्यवहारातून शिकलेले पाठ्य तिला भावतात, पावतात अशा समर्पक शब्दात मधुकर आष्टीकर यांनी अण्णा भाऊंचा आणि त्यांच्या साहित्याचा गौरव केला आहे. आणि तो अगदीच योग्य आहे. वाटेगावहून आपल्या वडिलांच्या समवेत मुंबईला पायी चालत येणारा हा साहित्य कोहीनुर पुढे आपल्या असामान्य प्रतिभेने साहित्य विश्वात अलौकिक तेजाने तळपत राहिला.

प्रतिभावंत शाहीर असलेल्या अण्णा भाऊंच्या प्रतिभेला खरा आकार मिळाला तो माटुंगा लेबर कॅम्पमध्ये. कॉ. शंकर नारायण पगारे यांनी अण्णा



भाऊंची प्रतिभा नेमकी -- आणि त्यांना दादर कलापथकात सामील करून घेतले. इथेच त्यांनी 'प्रथम मायभूच्या चरणा' हा गण आणि 'अकलेची गोष्ट' हा वग लिहिला. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने शाहीर अमर शेख गव्हाणकर आणि अण्णा भाऊ ही त्रिमुर्ती एकत्र आली आणि त्यांना या चळवळीचे सांस्कृतिक नेतृत्व केले. संयुक्त महाराष्ट्राच्या या लोक लढ्यातील सक्रीय सहभागातून अण्णा भाऊंच्या प्रतिभेचे अनेक पैलू लोकांच्या समोर आले.

१९४२ साली बंगाल मध्ये भीषण दुष्काळ पडला. दुष्काळाची दाहकता इतकी भयानक होती की या दुष्काळात लाखो लोकांचा उपासमारीने मृत्यू झाला. या दुष्काळ पीडित जनतेला मदत करण्याच्या उद्देशाने मुंबईतील काही साम्यवादी मंडळीनी एकत्र येऊन 'इपट्टा' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम करून बंगाल मधील दुष्काळाग्रस्तांना मदत करावयाची होती. या कार्यक्रमासाठी अण्णाभाऊंनी 'बंगालची हाक' नावाचा पोवाडा रचला आणि सादर केला. इथेच त्यांच्यातील अभिजात शाहिराचा जन्म झाला. पुढे त्यांनी स्टॅलीनग्राडचा पोवाडा, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा गिरणी कामगार, पंजाब दिल्लीचा दंगा असे एकूण चौदा ते पंधरा पोवाडे लिहिले. जातीयवादी पाचंद  चीड असलेले अण्णा भाऊ आपल्या पोवाड्यात म्हणतात,

द्या फेकून जातीयतेला करा बंद रक्तपाताला ।

भारतीयांनो इभ्रत तुमची ईर्षेला पडली द्य काढा बाहेर नौका देशाची वादळात शिरली ।

धरा सावरून एकजुटीने दुभंगली दिल्ली द्य काढा बाहेर राष्ट्रनौका ही वादळात शिरली ।

स्वत:वर अन्याय होऊ देऊ नका आणि दुसऱ्यावर अन्याय करू नका हा मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला आणि स्वत:ही जन्मभर जपला. शेतकरी आणि गिरणी कामगारांची दु:खे त्यांच्या साहित्यातून दिसून येतात.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मुंबई महाराष्ट्रातून वेगळी काढली जाईल ही काळीज पोखरणारी व्यथा त्यांना अस्वस्थ करीत होती. याच अवस्थेतून पुढे या लोकशाहिराने माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली ही ऐतिहासिक लावणी लिहिली. तर मलबार हिल व लालबाग, परळ या उपनगरांमधील महानगरीय विषमताही त्यांनी आपल्या लावणीतून भेदकपणे मांडली. त्यांच्या लावणी वाड्मयाचा आढावा घेताना समीक्षक डॉ. सदा कऱ्हाडे

म्हणतात, ''समाज परीवर्तनासाठी आणि क्रांतीसाठी लोकरंजनापेक्षाही लोकशिक्षणाची आवश्यकता असते हे भान ठेवून अण्णा भाऊंनी लावणी आणि तमाशा या रंजकतेला लोक शिक्षणाकडे वळविग्याचा प्रयत्न केला.''

पोवाडे आणि लावण्या लिहिणाऱ्या अण्णा भाऊंनी 'इमानदार' नावाचे एकमेव नाटक लिहिले. खेड्यापाड्यातील सावकारी, त्याचे जाचक परिणाम आणि त्यातून होणारी शेतकरी वर्गाची पिळवणूक यांचे वास्तव व विदारक चित्रण अण्णा भाऊंनी या नाटकात केले आहे. नाटकाच्या बरोबरच अण्णा भाऊंनी अनेक लोकनाट्य लिहिली. प्रचार आणि प्रसार हे उद्देश ठेवून तमाशाचे पारंपारिक रूप बदलून त्यात आवश्यक ते बदल करून त्यांनी प्रभावी लोकनाट्य लिहिली. या संदर्भात डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात त्याप्रमाणे, ''परंपरागत तमाशाची सुरावट घेऊन अण्णा भाऊंनी शाहिरीची नवी सजावट केली. शाहिरीची ही नवी सजावट 'लोकनाट्य' या अर्थपूर्ण नावाने ओळखली गेली. शाहीर अण्णा भाऊ साठे यांचा कलावंत म्हणून आदर करायचा तो लोकनाट्याचे प्रवर्तक म्हणूनच.'' गणानंतर सरळ वग सादर करण्याची परंपरा अण्णा भाऊंनी सुरू केली. म्हणूनच 'लोकनाट्याचे प्रवर्तक' हा डॉ. सदा करहाडे यांनी अण्णा भाऊंचा केलेला गौरव यथोचित आणि योग्यच आहे.

१९६१ मध्ये अण्णा भाऊंना साम्यवादी रशियाला भेट देण्याची संधी मिळाली. या प्रवासाचे वर्णन त्यांनी 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवासवर्णनात केले आहे. आपल्या रशिया प्रवासाच्या आठवणींचा उजाळा देतांना अण्णा भाऊ म्हणतात, ''रशियात मी नवी सृष्टी पाहिली. एक नवा समाज पाहिला. समाजवादाच्या सावलीत वाढलेली मुले नि फुलं पाहिली. जर मी सोविएत देश पाहिला नसता तर माझ्या जीवनात एक फार मोठी पोकळी राहून गेली असती.''

मराठी कादंबरीच्या शतकोत्तर प्रवासाच्या पार्श्वभूमीवर कुठलीही वाङ्मयीन पार्श्वभूमी अथवा वारसा नसताना अण्णा भाऊनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. 'अण्णा भाऊ ज्या कालखंडात लिहित होते....' अण्णा भाऊ 'जसे जगले त्याला जागले' ते लिहायला लागले आणि लिहीतच राहिले. कुठल्याही एका वाङ्मयीन प्रकारात त्यांनी स्वत:ला बंदिस्त करून घेतले नाही. केवळ कथा किंवा कविता अशा चौकटी, मर्यादा त्यांनी स्वत:भोवती आखून घेतल्या नाही. आपल्या लेखणीचा वारू त्यांनी मुक्तपणे चौफेर आणि चौखूर उधळला. म्हणूनच त्यांनी पोवाडा लिहिला तशी लावणीही लिहिली. नाटक लिहिले तसे लोकनाट्य आणि वग हि लिहिला. शिवाय मराठी साहित्य समृद्ध करणाऱ्या अत्यंत कसदार





अशा कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या. जगाचा प्रवास करण्याची संधी मिळालेल्या या उपेक्षिताने आपली भटकंती शब्दबद्ध करीत नितांत सुंदर अशी प्रवास वर्णन सुद्धा लिहिली. त्यामुळेच अण्णा भाऊंचे सर्वच साहित्य मोलाचे आणि जीवनाला उपयोगाचे आहे. कारण माणसाच्या जगण्याची लढाई या साहित्याचा मुख्य विषय आहे. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या तुकोबांच्या वचनाप्रमाणे माणसाची जगण्यासाठी चाललेली धडपड आणि जीवनाशी सुरू असलेला संघर्ष त्यांनी आपल्या साहित्यामधून मांडला आहे. 'खुळवाडी' या त्यांच्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांच्या कथालेखांचा गौरव करतांना थोर साहित्यिक आचार्य अत्रे म्हणतात, 'अण्णा भाऊ साठे यांच्या कथेचे एका वाक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे सांगता येईल की, हि जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे ही कच खाणारी, हार मानणारी मानसं नाहीत. या सर्वांना मानाने जगायचे आहे आणि अक्रमक वृत्तीशी निकराने लढून त्या सामान्यात त्यांना जिंकायचेही आहे.'' एकूणच अण्णा भाऊंचे सारे कथालेखन 'माझे स्वत:चे अनुभव सांगण्याजोगे आहेत' या उर्मीतून आले आहे. म्हणूनच 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णाभाऊ आपली साहित्यिक भूमिका मांडताना म्हणतात, ''मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्याबाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो.'' नैतिक मूल्यांचे पाठबळ असणाऱ्या कथा अण्णा भाऊंनी लिहिल्या या कथांमधून ही नैतिकता रुजविणारी विष्णुपंत कुलकर्णी, भीमा, सुलताना, गीता, अमीन अशी अनेक पात्रे त्यांनी जन्माला घातली. १९६० नंतरच्या दलित कथेची वाट त्यांच्या कथेने घालून दिली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

'भूक' आणि 'तृष्णा' या दोन मानवी प्रवृत्ती अण्णाभाऊंच्या लिखाणाचा स्थायीभाव आहे. दैनंदिन जीवनात अनुभव हे सर्वच माणसे घेत असतात मात्र अनुभव जेव्हा सांगण्यासारखे वाटतात तेव्हा सकस आणि श्रेष्ठ साहित्य निर्माण होत असते. अण्णा भाऊंचे अनुभव विश्व हे भीषण आणि जळजळीत वास्तवाच्या जाणीवेवर उभे होते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यातून वंचितांचा, लढणाऱ्या माणसांचा गौरव दिसून येतो. मानवमुक्तीच्या लढ्याच चित्रण त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

कथा आणि कादंबरीच्या रूपाने मराठी गद्यात मोलाची भर टाकणाऱ्या अण्णा भाऊंची 'वारणेच्या खोऱ्यात' ही पहिली कादंबरी १९७१ साली प्रकाशित

झाली. पुढे त्यांनी वैजयंती, चित्रा, आवडी, अलगुज, माकडीचा माळ, चिखलातील कमळ आणि फकीरा यासारख्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांची मध्यामांतरे होऊन पुढे या कादंबऱ्यांवर मराठीत चित्रपट निघाले त्यांच्या अनेक कथा आणि कादंबऱ्यांचे रशियन भाषेत अनुवाद झाले.

अण्णा भाऊंनी जन्मभर दीन-दुबळ्यांसाठी आणि पददलित, शोषित, वंचितांसाठी आपली लेखणी झिजविली. अनेक साहित्यप्रकार लिलया हाताळणाऱ्या अण्णा भाऊंच्या लिखाणाचे वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी हे सूत्र होते.

**संदर्भग्रंथ :**

१. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, संपा. अर्जुन डांगळे, नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे नाईक, डॉ. सुभाष सावरकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ - मुंबई

२. अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व, डॉ. प्रमोद गारोडे, कमल प्रकाशन, ठाणे.

३. अण्णा भाऊ साठे, बाबुराव गुरव, लोकवाङ्मय, गृह, मुंबई.

४. लोकराज्य, महाराष्ट्र शासन प्रकाशन, नोव्हे १९९३.

■ ■ ■





13

# थोर समाजसुधारक : अण्णा भाऊ साठे

■ डॉ. विठ्ठल भंडारे

चार्वाक, गौतम बुद्ध, कबीर, संत रविदास, महात्मा बसवेश्वर, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिबा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जगद्विख्यात साहित्यिक अण्णा भाऊ साठे या सर्व समाजसुधारकांत विचारवंताचे वैचारिक नाते आहे. सर्व महापुरुष विज्ञाननिष्ठ विचाराचे, परिवर्तनवादी, नवीन विचारांचे स्वागत करणारे, प्रस्थापित व्यवस्था नाकारणारे, परंपरावादाच्या विरोधात बंडाचा झेंडा हातात घेणारे आहेत. अण्णा भाऊ साठेसुद्धा आपल्या तत्त्वज्ञानात जागतिक कष्टकरी, मजूर, कामगार, शेतकरी, उपेक्षित समाज, शोषित समाज या सर्वांचा विचार करून ते म्हणाले, ''ही पृथ्वी शेषाच्या डोक्यावर नाही, तर कष्टकऱ्याच्या हातावर तरलेली आहे.'' त्यांनी असं विधान मुंबई येथे अ.भा. दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना हे घोषवाक्य उद्गारलेले आहे. सर्वच महापुरुषांनी जातीचा, धर्माचा,